## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ८.

## मी शपथेवर कथन करतो की,

**नाव –** पांडुरंग भिकाजी दोरुगडे

**वय** - ६२ वर्ष, **व्यवसाय** - सेवानिवृत सहा. फौजदार,

**राहणार.**- साधना हायस्कूल जवळ, गडहिंग्लज.

**सरकारतर्फे सरतपास– श्रीमती. एस. ए. म्हामूलकर, सरकारी वकील.**

**१.** मी आजरा पोलिस ठाण्यात सन २०१६ ते २०२० या कालावधीत सहा. फौजदार या पदावर उत्तूर दुरक्षेत्र अंमलदार म्हणून कार्यरत होतो. त्यावेळी दिनांक ०६/०८/२०१९ रोजी पांडूरंग इंजल यांनी अपघाताची तक्रार दिली होती. मी सदर तक्रार नोंदवून तपास कामी स्वतःकडे घेतली होती. आता मला त्याबाबतचा ऑक्यूरंन्स रिपोर्ट दाखविला. त्यावरती माझी स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि. क्र. ३३** देण्यात येतो. आता मला मी नोंदवून घेतलेली तक्रार दाखविली. तिला नि.क्र. १३ देण्यात आलेला आहे.

**२.** मी तपासकामी गुन्हयाच्या ठिकाणी जावून दोन पंचांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा करून दोन मोटार सायकल व एक कार तपासकामी ताब्यात घेतली होती. सदर गाडया अपघातग्रस्त असून मोडतोड अवस्थेत होत्या. आता मला तो पंचनामा दाखविला. त्याला नि. क्र. १९ देण्यात आलेला आहे. मी पंचनामा करताना घटनास्थळाचा समजूतीचा नकाशा तयार केला होता. आता मला तो नकाशा दाखवला, तो तोच असून बरोबर आहे त्याला **नि. क्र. ३४** देण्यात येत आहे.

**३.** त्यानंतर मी तपासकामी साक्षीदारांचे जबाब नोंदविले होते. मी तपासकामी आरोपींना मो.वा.का.कलम २०९ प्रमाणे नोटीस दिली होती. आता मला त्या नोटीशीची प्रत दाखविली. त्यावरती माझी व आरोपीची स्वाक्षरी आहे. तिला **नि. क्र. ३५** देण्यात येत आहे. त्यानंतर पुढील तपास पो.उ.नि. जगताप यांचेकडे देण्यात आला होता. मला मी केलेल्या तपासामध्ये आरोपीने निष्काळजीपणे भरधाव वेगात त्याच्या ताब्यातील वाहन रस्त्याच्या विरुध्द बाजूला नेवून पांडूरंग व वसंत यांना जखमी करून निशांत केसरकर च्या मृत्यूस कारणीभूत झालेचे निष्पण झाले होते. आरोपी आज न्यायालयात

हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी तर्फे उलटतपास – श्री. पालकर वकील.**

४. सदर घटनेची तक्रार मिळालेले दिवशी उत्तूर दुरक्षेत्रात मी व पोलीस हवलदार दबडे असे दोघेच कार्यरत होतो. पांडूरंग इंजल अंदाजे दुपारी २ नंतर तक्रार दयायला आलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, गुन्हा नोंद झाल्यानंतर तपासकामी वरीष्ठांच्या आदेशाने कार्यलय सोडावे लागते. सदर गुन्हयाच्या तपासकामी कार्यलय किती वाजता सोडले याची नोंद घेणे गरजेचे नसल्यामुळे मी घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तपासकामी जात असल्याची नोंद करून कार्यालय सोडणे बंधनकारक असते.

५. मी व दबडे आमच्या मोटार सायकलने घटनास्थळी गेलो होतो. आम्ही दोघे तपासकामी गेल्यामुळे त्यावेळी उत्तूर दुरक्षेत्र येते कोणीही हजर नव्हते. मी तपासकामी घटनास्थळी गेलो तेव्हा मला आरोपी तेथून पळून गेल्याचे समजले होते. घटनास्थळी जखमी व मयताचे नातेवाईक आणि आरदाळ गावातील लोक जमलेले होते. मी घटनास्थळी गेलो तेव्हा ब्रीजा गाडीचा टायर फुटलेला पाहिला होता.

६. मी घटनास्थळी गेल्यावर तेथे जमलेल्या लोकांमधून दोन पंचाना बोलावले होते. सदर पंच माझ्या ओळखीचे नाहीत. मी पंचनामा करतेवेळी पावसाचे दिवस होते. त्यावेळी पाऊस येत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पावसामुळे रस्ते बंद झाले होते. मला पंचनामा केल्या दिवशी आंबेओहोळ नाल्याला पाणी आल्यामुळे आजरा–गडहिंग्लज रस्ता बंद असल्याची तसेच गारगोटी – गडहिंग्लज रत्यावरील पुल वाहून गेल्याची माहिती नाही.

७. मी पंचनामा केल्या दिवशी तीन साक्षीदारांचे जबाब नोंदविले होते. त्यानंतर दुस–या दिवशी इतर साक्षीदारांचे जबाब नोंदविले होते. घटनास्थळापासून उत्तूर पोलीस चौकी ३ किमी अंतरावरती आहे. घटने दिवशी जखमी व मयताचे नातेवाईक साधारणता एक ते दिड तास उत्तूर चौकी मध्ये आले होते. हे म्हणणे खरे नाही की, ते पोलीस चौकी मध्ये येवून गोंधळ घालत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस ठाणेत बसून घटनास्थळ पंचनामा व साक्षीदारांचे जबाब तयार केले आहेत. हे म्हणणे

खरे नाही की, सदर गुन्हयात आरोपीचा कोणताही सहभाग नसताना मी चुकीचा तपास केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १७.०५.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते